
# माहे एप्रिल २०२१ चा मासिक अहवाल

## मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | मॅक्सी | १. पोहवा /२२७२ के.एस.दास<br>२. पोशि/१०६७ एस.पी.चौधरी | आरमोरी पो.स्टे. गु.र.नं. १००/२०२१ भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.०४/०४/२०२१ रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे घटनास्थळावर गुन्हेगाराने हाताळलेले रक्ताने माखलेली कु-हाड, हाफ पॅन्ट, व टि शर्ट चा वास श्वान कॅक्सी हीस देवुन सोडले असता अंदाजे २०० मीटर अंतरावर जावुन एका इसमाजवळ भुंकू लागली पुन्हा वास देवुन सोडले असता त्याचेजवळच जवा ुन भुंकत होती सदर इसमास पोलीस स्टेशनचे स्टाफने ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २. | उस्मानाबाद | कॅप्टन | १. पो.हवा. १०३ एस.पी. वडणे<br>२. पो.कॉ. १५४८ एस.सी. शाहीर | उस्मानाबाद पो.स्टे. गु.र.नं. ८४/२०२१ कलम ०८ (सी), २० (सी)(बी), (२)(क),(क), २९, एन.डी.पी.एस. ॲक्ट दि. १५/०४/२०२१ रोजी घडला असुन घटनास्थळावर काळया रंगाची वेरना कार क्रं. एम.एच. ०३ बी. ९०५६ मिळून आली. सदर कारमध्ये गांजा वाहतूक होत असल्याबाबत माहिती मिळाली होती. सदर गुन्हयामध्ये श्वानाचा वापर करण्यात आला. श्वान कॅप्टन याने वाहनाच्या चारही बाजूस जावुन खात्री केली व वाहनाचे डिक्की पाशी जावून इशारा दिला. यावरून सदर वाहनामध्ये गांजा ची वाहतूक होत असलेबाबत खात्री झ ाली व गुन्हा उघडकीस आला. सदर वाहनामध्ये २७ किलो ९८९ ग्रॅम वजनाचा गांजा व वाहन एकुण ७,३८,९०९/- रूपये किंमतीचा माल मिळून आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | सांगली | कुपर | १. पोहवा/४९७ एस.एल.भोरे<br>२.मपोशि/३७३ एस.एस.आतार | जत पो.स्टे. गु.र.नं. १७७/२०२१ भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.१६/४/२०२१ रोजी दाखल असुन घटनास्थळा वरील संशयीत आरोपीने वापरलेले दगडाचा वास श्वान कुपर यास देवुन सदर गुन्हयातील ०६ संशयीत पुरूष आरोपींची एका रांगेत उभे करून ओळखपरेड घेतली असता अ.क्र. ४ जवळ बसून भुंकून इशारा दिला. पुन्हा दगडाचा वास श्वान कुपर यास दिला असता श्वान कुपर क्र ४ चे संशयीत इसमासमोर वास घेवुन भुंकू लागला सदर इसमासकडे तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | बुलडाणा | ज्युली | १. पोना/२०५३ राजेश पदमाणे<br>२. पोशि/२३४९ प्रविण गवई | शेगाव रेल्वे पो. स्टे. गु.र.नं. ३६/२०२१ भा.द.वि. कलम ३०२, २०१, ३४ हा गुन्हा दि.१८/४/२०२१ रोजी दाखल असुन घटनास्थळावरील मयताचे हातापायाला बांधलेल्या नारळाच्या दोरीचा वास श्वान ज्युली हीस दिला असता ती वास घेत अंदाजे १.५ ते २.० किमी अंतरावर असलेल्या मयताच्या घरापर्यंत येवुन थांबली त्यानंतर दि. २०/४/२०२१ रोजी संशयीतांची ओळखपरेड घेतली असता दोन संशयीतांवर झेप घेवुन इशारा दिला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | सिंधुदूर्ग | मायलो | १.पोशि/५६३ एन.व्ही.चव्हाण<br>२.पोना/७२६ सी.एस.मोरजकर | दोडामार्ग पो.स्टे. गु.र.नं. ३४/२०२१ भा.द.वि. कलम ३३७, ३३८, २८६, शस्त्र अधिनियम ३ (१) २५, २७ हा गुन्हा दि.२१/४/२०२१ रोजी घडला असुन घटनास्थळावरील जखमी इसमाचे वापरती टोपीचा वास श्वान मायलो यास दिला असता श्वान रोडच्या बाजुचे केळीचे बागेत जावुन जमिनीवरील प्लॅस्टीकचे कापड पसरवुन ठेवलेल्या ठिकाणी येवुन थांबला व वारंवार त्या जागेचा वास घेवु लागला सदरचे प्लॅस्टीक कापड बाजुला केले असता सदर ठिकाणी गाव (ठासणीच्या) बंदुकीसाठी लागणारे सामान दिसुन आले. त्यामध्ये १) दोन मोठे छर्रे २) ६४ लहान छर्रे ३) २१ चांगल्या केप ४) ३ फुटलेल्या केप ५) ९ मध्यम बेरींग बॉल ६) गंधक असलेल्या फटाक्याच्या तीन पट्टया ७) काथ्या ८) एका पिशवितील गनपावडर कंटेनरमध्ये ९) ३४ इंच लांबीची ६ इंच पाईप मिळून आली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ६. | परभणी | जॉनी | १.पोहवा/८७८ ठाकुर<br>२. पोशि/१४८० जाधव | पाथरी पो.स्टे. गु.र.नं. १४१/२०२१ भा. द. वि. कलम ३०२, २०१ हा गुन्हा दि. २७/४/२०२१ रोजी दाखल असुन घटनास्थळावरील लाकडी बांबुचा वास श्वान जॉनी यास दिला असता श्वान अंदाजे ७५ मीटर आंतरावर असलेल्या लोकांचे घोळक्यात शिरून त्यात असलेल्या एका व्यक्तीचे अंगावर जावुन भुंकत होता त्यास पो.स्टे. अधिकारी नी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. |

